# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०९/२०२६ (सोमवार )**

**गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद**
**०२ गोवंश जनावरांची सुटका, आरोपी अटक**
**कन्हान पोलीसांची कामगिरी**

पोलीस स्टेशन कन्हान :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. शशांत एन. एम. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे यांच्या नेतृत्वाखाली कन्हान पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीवर कारवाई करून २ जनावरांची सुटका करत एकुण ०४ लाख ३० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक १२/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तारसा चौक, कन्हान येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.पी ३५ जी.एन. ०२४१ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता आरोपी नामे **किरण भोजराज उईके, वय २३ वर्ष, रा. सिवनी, राज्य मध्यप्रदेश** हा मिळुन आला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०२ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम. पी—३५/जी.एन. ०२४१ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०२ गोवंश जनावरे किंमती ३०,०००/— रूपये, असा एकूण ४,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद**

**प्रकरणी आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ११(१), (ब), (क), प्राण्यांचा छळ अधिनियम, कलम ५ (अ) (१), ५ (अ) (२), ९ महा पशु संरक्षण अधि १९७६, सहकलम १८४, १९१ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०१ लाख ५२ हजार ९९० रूपयांचा मुद्देमाल जप्त कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १३/०९/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा भोरदेव येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अनिल बापुराव आखरे, वय ३५ वर्ष, रा. जाखेगाव २) सुगत चंद्रभान बोरकर, वय ३० वर्ष, रा. भोरदेव ३) सुरज श्रीरंग शेंडे, वय २५ वर्ष, रा.रानमांगली, ता. कुही, जि. नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ५९९०/—रूपये, ०२ मोटरसायकल, ०३ ॲन्ड्राईड मोबाईल असा एकुण १,५२,९९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कुही येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक १३/०९/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा रेवराल शिवार रेल्वे पुलाचे खाली कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस तात्काळ घटनस्थळी पोहचले असता, आरोपी नामे **१) उदेयभान हीराजी निंबुळकर, वय ३५ वर्ष रा. रेवराल ता. मौदा आणि २) विक्की जगदिश मोहणे, वय ३२**

**वर्ष ता. मौदा** हे कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून आरोपीच्या ताब्यातून रोख रक्कम २३००/— रूपये, २ कोंबडे किंमती १८,००/—रूपये, आणि २ लोखंडी धारदार काती प्रत्येकी असा एकुण किंमती ४१३० /— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०५ गुन्हे दाखल,

**दिनांक १३/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे विवेक उर्फ विक्की प्रेमदास मेश्राम, वय ४० वर्ष, रा. धानला याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे वनवास गुलाब गायमुखे, वय ४२ वर्षे, रा. तास, ता. भिवापुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी नामे प्रणय सुधाकर राऊत, वय २६ वर्ष, रा. धोत्रा, मोहदी, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे रावजी मोहन परतेकी, वय ३५ वर्ष, रा. सिदेंवानी, ता. सावनेर जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत महिला** आरोपी नामे हिचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ६३९० मिली देशी दारू, ०५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ३३४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार खेळणाऱ्या १६ आरोपींवर गुन्हे दाखल ०१ लाख ५३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करून विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या १६ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन अरोली** येथे ०२ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या कोंबडयाची झुंज लावुन जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा नोंद** आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा, आणि ५ आरोपीविरूध्द **१ गुन्हा,** नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हे** नोंद करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे.

**वर प्रमाणे १६ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते व ०२ मोबाईल, ०२ मोटरसायकल, नगदी आणि इतर मुद्देमाल एकुण १,५३,९८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर